म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय
दा. क्र.





हरि नारायण आपटे

IRBK-0108807

# ना ट सापडली आ णि
# तू माझा सांगाती

द्वितीय श्रेणी

आळंदी लेखक शिबीर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

किंमत २५ नवे पैसे

IRBK-0108807

प्रकाशक : व्ही. बी. कर्णिक, चिटणीस, महाराष्ट्र प्रादेशिक लोकशिक्षण समिति,
३१९ सोमवार पेठ, पुणें २.

मुद्रक : व्ही. आर. शिगरे, सर्वोदय मुद्रणालय, ४५० बुधवार पेठ, पुणें २.

वा. क्र. ८८०५
दि. ७।०।१०
३०६४
वि. वा.
दि. ४।७।५९
वाचनालय

# वाट सापडली



पौषी पौर्णिमा आली. नाथाची जत्रा आली. आबईला नवसाची आठवण झाली. तापसरीतून मानाजी वाचला होता. तिने त्याला नाथबाबाचा अंगारा लावला होता. नाथबाबानेच कारभाऱ्याला वाचविले असे तिला वाटले.

पुरणपोळीच्या नैवेद्याचा नवस होता तिचा. तिने पुरण खायचे सोडून दिले होते. नवस फिटल्यावर ती पुरण खाणार होती.

मानाजीच्या मागे तिची रोज भुणभुण सुरू झाली, " पुशी पुनवंला खरसुंडीला जायचं. नाथाचा नवस फेडायचा. "

मानाजीने जायचे कबूल केले. आबईला आनंद झाला. ती सगळीकडे सांगत सुटली, " आम्ही दोघं खरसुंडीला जानार. "

शेजारची बबई आली. ती म्हणाली, " नाथाचा परसाद आणा. "

मान्यांची मंजुळा आली. ती म्हणाली, " चोळीला कटकीचा खण आणा. "

गिरजा माळीण म्हणाली, " पोराला बत्तासं आणा; लिमलेटच्या गोळ्या आणा. "

कोणी कांही कोणी कांही सांगितले.

मानाजी म्हणाला, " होय आणतो. "

आबई म्हणाली, " होय आणते. "

मानाजीला वाटले, रुप्या खोंड जत्रंत काढून टाकावा. बघेल त्याला हुंदडतो.

मग खरसुंडीला पायीच जायचे ठरले. पण वाट कोणास माहीत ?

मानाजी म्हणाला, " विचारू कोणास तरी. "

आबईने तयारी केली. भाकऱ्यांची चवड घेतली. गाठोडे बांधले. खोंडाला घेऊन दोघे चालली.

एक दिवस गेला. दुसराहि गेला. तिसरा संपत आला. दिवस मावळला. घाट चढून दोघे आली. त्याना वाटले होते, दिवे लागणीला आपण खरसुंडीला पोचू.

कुणी तरी त्याना सांगितले होते, " घाट ओलांडल्यावर खरसुंडी आलीच. "

चांदणे पडले होते. पायवाट उमगेना. त्यात तीन बाजूना तीन वाटा फुटलेल्या. मानाजीने सगळीकडे नजर फिरविली. इकडे पाहावे दिवा लुकलुकतो. तिकडे पाहावे दिवा लुकलुकतो.

मानाजीने आबईला विचारले, " आता काय करायचं ग ? यांतलं खरसुंडीचं दिवं कोणतं ? "

आबई म्हणाली, “ ते मला काय इचारता ? मला ठावं असतं, तर मी एकलीच आले नसते का ? तुमास्नी कशासाठी बरोबर आणलंया ? ”

मानाजी विचारात पडला. वाटेवरची वर्दळ थांबली होती. वाट विचारायला माणूसहि दिसेना. त्याला समजेना, नाथाची येवढी मोठी जत्रा आणि वाटेवर माणूसहि नाही ? मग त्याला आठवले. कोणी तरी त्याला सांगितले होते, घाटात चोरटे फार आहेत. अंधार पडला कीं कोणी तिकडे फिरकत नाही.

त्याच्या पोटात धस्स झाले. त्याच्या मनात विचार आला, कोणत्या तरी दिव्याच्या दिशेने जावे. पण ते गाव खरसुंडी नसले तर ? आली का पंचाईत ? हेलपाटा पडणार. नाथाच्या नैवेद्याचा दिवस हुकणार.

आबई चालून चालून थकली होती. काय करावे त्याला समजेना. कडेला एका खांबाला पाटी होती. तो पाटीजवळ गेला. त्याने ती नीट न्याहाळून पाहिली. तिच्यावर कांही तरी लिहिले होते.

तो पुटपुटला. “ कुना लेकाला वाचाय येतंया ? बानं शिकवलंबी नाही. ”

आबईला तो म्हणाला, " तूं तरी बघ काय आहे पाटीवर. "

आबई म्हणाली, " मला वाचाय येत नाही. ते येत असतं, तर तुमच्या घरची भांडी घासली नसती. "

मानाजी गप्प बसला. इतक्यात कोणी तरी धावत आले. मानाजीने त्याला थांबविले. त्याला विचारले. तो होता कानडी बोलणारा. कोणाचे कोणाला समजेना. पडलेला तिढा उलगडेना.

वडाच्या झाडाखाली तो बसला. आबईदेखील बसली. ढोल, झांजा यांचा आवाज आला. मानाजीने कान टवकारले. पण दुसऱ्या बाजूने ढोलकी पिपाणीची घाई उठली. तिसरीकडून ताशा तडतडू लागला. कोठून काय वाजते हेच त्याला कळेना. त्याने कपाळावर हात मारून घेतला. डोके धरून तो गप्प बसला. आबई नाथबाबाचे नाव घेऊ लागली.

सारी रात्र त्यानी झाडाखाली काढली. पहाट झाली. चांगले फटफटले. माणसांची वर्दळ सुरू झाली.

मानाजीने एकाला विचारले, " खरसुंडी कुठं आहे हो ? "

तो माणूस हसला. "अहो ही काय हातं धोंड्यावर. ते बघा, नाथबोवाचं शिकर दिसतया."

त्याने बोट दाखविले, मानाजीने नीट पाहिले. आबईनेहि नीट पाहिले. खरेच, जवळ होती खरसुंडी.

आबई म्हणाली, "काल रातीच गेलो असतो तर? थंडीचं उगीच कुडकुडत बसावं लागलं हातं!"

तो माणूस म्हणाला, "इथं ही पाटी आहे ना! हिच्यावर लिहिलं आहे 'खरसुंडी दोन मैल!' बाणानं वाटबी दावलिया."

मानाजी शरमला. तो म्हणाला, "ततंच तर अडतंया. वाचाय येत असतं तर मंग कशाला? ततंच अडतंया!" मग सर्व जण नाथाला गेले.

नाथाचा नैवेद्य झाला. आबईने पुरण खाल्ले. रुप्या खोंडाचा पैकाहि चांगला आला. मानाजी मोठ्या खुषीत जत्रेत फिरू लागला. आबई बरोबर होतीच.

ती म्हणाली, "आवं, हे बघा खणाचं दुकान. ते बघा बत्तासं तिथं मिळत्यात."

मानाजी म्हणाला, “ थांब, आदुगर पाटी-पेणसल घ्यायची. ”

आबईने विचारले, “ ती कुनाला ? अजून पोरगा जलमलाबी न्हाई. ”

मनाजी म्हणाला, “ पोराला न्हाई, पोराच्या आईला आन् बाला. रघुमास्तरला इच्यारनार आहे, लिवाय वाचाय शिकवतुस का ? हो, कालच्यावानी पुन्हा फजिती नगं. ”



# तूं माझा सांगाती



नानासाहेब देशमुख संतापले. रोज घरात भांडणे होत असत. सूनबाई बड्या घरची होती. बायजाबाईला वाटले, आपण थकलो, सूनबाई आता सगळे बघेल. पण झाले सगळे उलटे. सासूलाच सुनेचे करावे लागे.

आदळआपट सुरू झाली. बाळासाहेब बायकोचा कड घेऊ लागला. नानासाहेबांचा तो एकुलता एक मुलगा, पण नानासाहेब सहन तरी किती करणार ?

अखेर नानासाहेब कडाडले, "चालता हो बायकोला घेऊन. पटत नसेल तर खळ्यात रहा. तुझी तरी खुमखुमी जिरू दे."

त्यानी भजनाची झांज जोरात आपटली. मांडीवर बसलेला नातू म्हणाला, "आजोबा म्हणाना, जेथे जातो तेथे——"

गिरजेने दरकन् त्याला ओढले. पाठीत जोराचा धपाटा घातला. बिचारा दौलू मुळुमुळू रडू लागला.

गिरजा त्याच्यावर खेकसली, "सारखा आजोबा आजोबा करतो. त्यांची पाठ सोडत नाही."

दौलूला तिने फरफर ओढले. नानासाहेब गहिवरून म्हणाले, "सूनबाई, दौलूला ठेव इथं. त्या पोराला काय त्याचं?"

"पुरे झाला दौलूचा पागूळ! पोटच्या पोराला हाकलून देत्यात, आन् नातवंडाला जवळ करत्यात. लोक काय म्हणतील?"

बाळासाहेबाचे शब्द नानाना झोंबले. त्यांच्या डोळ्यात पाणी उभे राहिले. दौलू ओरडू लागला, " आजोबा. आजोबा ! " नानांच्या मनात कालवा-कालव झाली. बायजाबाईने पदराने डोळे पुसले.

दिवसामागून दिवस जाऊ लागले. भजनाच्या वेळी नानांच्या मांडीवर दौलू नसे. झांज वाजवून नाना म्हणत, " जेथे जातो तेथे—"

नाना थोडे थांबत. पण मागे म्हणायला दौलू नाही, असे पाहून नाना डोळे मिटत. ते घोगऱ्या आवाजात पुढची ओळ म्हणत, " तूं माझा सांगाती "

दिवेलागणीच्या वेळेला नाना खंडोबाला जात. रोज त्याना डिगामामा विचारी, " नानासाब, कुनी धरलं आहे हो तुमच्या बोटाला ? "

मग त्याना आठवत असे, आपल्याबरोबर दौलू नाही. हाताचे बोट मिटवून घेताना डोळे पाणावत. दौलूला पाहावेसे त्याना सारखे वाटे. पण पुन्हा मानेला ते जोराचा हिसडा देत.

× × ×

चार दिवस झाले. दौलूचा ताप उतरेना. मधूनच तो वाकळ फेकून देई. जोराने ओरडे,

"आजोबा मी येतो खंडोबाला." डोळे मिटून हात जोडी. पुटपुटल्यासारखे करी आणि म्हणे, " आजोबा म्हणाना पुढची ओळ—तूं माझा सांगाती."

गिरजा म्हणे, "पोराला लागिर झाले." बाळासाहेब म्हणे,"पोराने आजोबाचा धोसरा काढला."

गिरजा बाळासाहेबास म्हणाली, "नानाना आणता का बोलावून?"

बाळासाहेब म्हणाला, "आता कोणत्या तोंडानं जाऊ त्यांच्याकडं? फाडकन् लगाऊन देत्याल."

गिरजा काकुळतीने म्हणाली, "त्याना म्हणावं तुमचा नातू बोलावतो आहे."

बाळासाहेब गप्प उभा राहिला. त्याने खाली मान घातली. गिरजा त्याच्याकडे पाहू लागली. हूं नाही कीं चूं नाही! मनातल्या मनात तिने नवस केले.

नाथबाबाला म्हणाली, "तुला चांदीचा घोडा देईन."

खंडोबाला म्हणाली, "तुला लंगर तोडीन."
यमाईला म्हणाली, "येशीपासनं तुला लोटांगण घालीन."

सटवाई, मरीआई, जाखाई,—सगळ्या देवाना तिने नवस केले.

दौलूचे बडबडणे थांबेना. पुन्हा ती बाळासाहेबास म्हणाली, "मग जाता ना? त्याना म्हणावं चुकलं आमचं–"

तिला पुढे बोलवेना. डोळ्यातून आसवे आली. बाळासाहेबाने तिच्याकडे पाहिले. तो लक्कन् हालला. खोलीत येरझारा घालू लागला.

गिरजा उसळून म्हणाली, "तुम्ही नाहीं जात? मी जाते. नानाना म्हणते, हे पायतान घ्या. हाना माज्या डोसक्यात. पर दौलूसाठी चला. दौलू तुमचा हाय!!"

गिरजा उठली. तिने उंबऱ्यात पाऊल टाकले. दौलू पुन्हा ओरडला. तिचे हातपाय गळाले. तिने पुन्हा धीर केला. उंबऱ्याबाहेर तिने पाऊल टाकले. दौलूने सगळे बळ एकवटले. तो जोराने ओरडला "आजोबा !"

"आलो, आलो हं बाळ." घराच्या बाहेरून आवाज आला. गिरजा पटकन् माघारी फिरली. "दौलू, नाना आले. ते बघ. उघड डोळे." दौलूच्या डोक्यावरून हात फिरवीत ती म्हणाली.

दौलूने डोळे उघडले. नाना धावतच आले. त्यानी हातातली काठी दूर भिरकावली. दौलूला उचलले. "दौलू, काय रे बाळा हे झालं तुझं !"

नानाना पुढे बोलवेना. दौलूने हात वर केले. आजोबानी मान खाली केली. दौलूचे हात आजोबांच्या गळ्याभोवती पडले.


दौलू खालच्या आवाजात म्हणाला, "आजोबा आता नाही ना जाणार तुम्ही ?"

"नाही बाळ, मी हातंच तुज्यापाशी -हानार. मला हाकलून दिलं तरीबी न्हाई जानार. तुझी

आजीबी येतिया तुझ्यावरून तुकडा ववाळून टाकाया."

नानानी बाळासाहेबाकडे न्याहाळून पाहिले. गिरजेकडे नजर फिरवली. दौलू म्हणू लागला, "जेथे जातो तेथे–" नानानी साथ दिली, "तूं माझा सांगाती."

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. नों दि
दि.



IRBK-0108807
अनुक्रम 303.0
विभाग
क्रमांक
नों. दि.